सायं.दैनिक
# विश्वनायक
Email : vishvanayak94@gmail.com
• संपादक : बिलाल शेख •
Mo.86868 88898

| बीड (महाराष्ट्र) | दैनिक | द्विभाषिक | वर्ष ०२ अंक - २५२ बुधवार, दि.१७ सप्टेंबर २०२५ | आरएनआय -एमएएचबीआयएल १०५४८ | किंमत २ रू | । पाने ४ |
|---|---|---|---|---|---|---|
| Beed (Maharashtra) | Daily | BILINGUAL | Year 02 Issue - 252 WEDNESDAY, DT.17 SEPTEMBER 2025 | TC : MAHBIL10548 | PRICE - 2 RUPEES | PAGES - 4 |

## केज जवळ कार पुलाला धडकून दोघे ठार

केज - कार पुलाच्या कठड्याला धडकून झालेल्या भीषण अपघातात कारमधील दोघे ही ठार झाल्याची घटना केज मांजरसुंबा राष्ट्रीय महामार्गावर कदमवाडी फाट्याजवळ मंगळवारी (दि. १६) पहाटे ६ वाजेच्या सुमारास घडली. अपघातात मरण पावलेल्या व्यक्तींमध्ये परळी येथील बूट, चप्पलचे ठोक विक्रेते इम्रान इब्राहिम कच्छी (वय ५०) व चालक अझरुद्दीन बाबूमिया शेख (वय ४०) या दोघांचा समावेश आहे. परळी येथे इम्रान इब्राहिम कच्छी (वय ५०) यांचा फुटवेअरचा ठोक विक्रीचा व्यवसाय आहे. ते काही कामानिमित्त मुंबई येथे गेले होते. तेथून ते कारने (एम.एच. ०२ सीएच ६७८९) परळीकडे निघाले होते. मंगळवारी पहाटे ६ वाजेच्या सुमारास त्यांची कार ही केज - मांजरसुंबा राष्ट्रीय महामार्गावर कदमवाडी फाट्याजवळ आली असता अचानक कार रस्त्याच्या खाली उतरुन पुलाच्या कठड्याला धडकली. या झालेल्या भीषण अपघातात कारमधील इम्रान कच्छी व कार चालक अझरुद्दीन शेख या दोघांचा गंभीर जखमी होऊन जागीच मृत्यू झाला.

# बीडमध्ये रेल्वे नव्हे तर विकासाची वाहिनी पोहोचली, गोपीनाथ मुंडेंना ही रेल्वे अर्पण : देवेंद्र फडणवीस

बीड : मराठवाड्यातील बीडमध्ये आज रेल्वे नाही तर विकासाची वाहिनी पोहोचली आहे, त्या माध्यमातून विकासकामांना वेग मिळेल. बीडमध्ये सुरू झालेली ही रेल्वे गोपीनाथ मुंडेंना अर्पण करतो असं वक्तव्य राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं. बीड ते अहिल्यानगर अशी रेल्वे सुरू झाली असून त्या गाडीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी हिरवा झेंडा दाखवला.

आज सरकार सर्व परीने आपल्या पाठीशी आहे. मराठवाड्यातील सर्व प्रकल्पांना आवश्यक निधी देऊ असं आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिलं. आजचा दिवस हा श्रेयवादाचा नाही. बीडमध्ये रेल्वे सुरु होण्यासाठी अनेकांनी प्रयत्न केले. हा जगन्नाथाचा रथ आहे, अनेकांचा हात या कामासाठी लागला.

बीडची रेल्वे गोपीनाथ मुंडेंना अर्पण

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, ज्यांनी आम्हाला दिशा दाखवली त्या गोपीनाथ मुंडेना मी वंदन करतो. आज बीडच्या जनतेच्या स्वप्नपूर्तीचा योग आहे. केशरकाकू क्षीरसागर, गोपीनाथराव मुंडे यांनी रेल्वेचे स्वप्न बघितलं. पितृपक्षामध्ये आपल्या पितरांना काहीतरी अर्पण करायचं असतं, आम्ही गोपीनाथराव मुंडे यांना ही रेल्वे अर्पण करत आहोत. रेल्वे संघर्ष समितीचेदेखील मी अभिनंदन करतो. या रेल्वेसाठी आपण सातत्याने पाठपुरावा केला आहे.

### पुढच्या पीढीला दुष्काळ बघू देणार नाही

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मराठवाड्याच्या पुढच्या पीढीला दुष्काळ बघू देणार नाही. कोल्हापूर-सांगलीमध्ये जो पूर येतो ते पाणी उजनीला आणणार आणि तिथून ते पाणी मराठवाड्यात आणणार. वेगवेगळ्या माध्यमातून मराठवाड्यातील दुष्काळ संपवणार. त्यासंबंधी हे सरकार काम करत आहे.




### बीडमध्ये पहिली रेल्वे सुरू

बीड जिल्ह्यासाठी आजचा दिवस ऐतिहासिक ठरला आहे. मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या निमित्ताने बीड शहरात प्रथमच रेल्वे धावत आहे. यामुळे केवळ बीडकरांमध्येच नव्हे, तर संपूर्ण मराठवाड्यात उत्साहाचे वातावरण आहे. अहिल्यानगर ते बीड मार्गावर आजपासून पहिली रेल्वे धावणार आहे. या रेल्वे मार्गामुळे बीडचा आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक विकास नव्या उंचीवर पोहोचेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, रेल्वे प्रकल्पात जमीन अधिग्रहण अवघड काम होतं. सगळ्या प्रकल्पामध्ये ५० टक्के सहभाग राज्य घेईल अस पत्रं आम्ही केंद्र सरकारला दिले.

## माहिती अधिकार महासंघाचे राज्यव्यापी अधिवेशन सोलापूर येथे संपन्न; उत्कृष्ट कार्यकर्ता म्हणून डॉ.गणेश ढवळे सम्मानित

प्रतिनिधी @ बीड

माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ (फेडरेशन) ही महाराष्ट्रातील जागरूक नागरिक व माहिती अधिकार कार्यकर्त्यांची सर्वात मोठी संघटना असून, महासंघाचे राज्यव्यापी अधिवेशन दि.१४ सप्टेंबर रोजी शिवछत्रपती रंगभवन, सोलापूर येथे मोठ्या थाटामाटात संपन्न झाले. या अधिवेशनासाठी राज्यातील ३५ जिल्ह्यांतील शेकडो कार्यकर्त्यांनी उपस्थिती लावली होती. अधिवेशनाचे उद्घाटन नाशिकचे सुप्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते व निर्भय महाराष्ट्र पार्टी चे संस्थापक अध्यक्ष जितेंद्र भावे यांच्या हस्ते डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन व दिप प्रज्वलीत करून करण्यात आले. शासन व प्रशासन भ्रष्टाचारमुक्त व पारदर्शक करण्यासाठी संघर्ष करणे, तसेच निर्भयपणे लढा उभारण्याचे आवाहन त्यांनी या प्रसंगी कार्यकर्त्यांना केले.



महासंघाचे संस्थापक अध्यक्ष सुभाष बसवेकर यांनी शासनाच्या विभागातील अनेक ज्वलंत प्रश्नांवर त्याचप्रमाणे कार्यकर्त्यांवर खोटे गुन्हे दाखल करण्यात येत असल्याबाबत चर्चा करण्यात आली.कारवयकरत्यावर होत असलेले हल्ले, खोट्या केसेस तसेच अन्याय होईल तिथे आपली एकजूट दाखवून लढा द्यावा.असे प्रतिपादन केले. या अधिवेशनात विविध सामाजिक विषयांवरील अनोख्या आंदोलनांच्या माध्यमातून सामान्यांचे प्रश्न सोडविणाऱ्या बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता व मुख्य प्रचार प्रमुख डॉ.गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांना उद्घाटक जितेंद्र भावे यांच्या हस्ते प्रमाणपत्र व सन्मान चिन्ह प्रदान करून विशेष सन्मान करण्यात आला.यावेळी माहिती अधिकार कार्यकर्ते हरिओम क्षीरसागर, जावेद सिद्दीकी आदी मान्यवर उपस्थित होते.या अधिवेशनात महाराष्ट्र राज्यातील मोठ्या संख्येने पदाधिकारी उपस्थित होते.

## थेरला शिवारात दरोडा - मिसाळ कुटुंबावर चोरट्यांचा जीवघेणा हल्ला! परिसरात भीतीचे वातावरण

प्रतिनिधी @ पाटोदा

पाटोदा तालुक्यातील थेरला शिवारात सोमवारी मध्यरात्री चोरट्यांनी धाड टाकून भीमराव मिसाळ व त्यांची पत्नी सत्यभामा भीमराव मिसाळ यांच्या घरावर दरोडा टाकला. यावेळी चोरट्यांनी घरातील सदस्यांना जीवे मारण्याचा प्रयत्न करत लोखंडी रॉडसह जबर मारहाण केली. या घटनेत भीमराव मिसाळ गंभीर जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.



चोरट्यांनी घरातील रोकड, दागिने लंपास केले असल्याचे प्राथमिक माहितीवरून समोर आले आहे. मध्यरात्री झालेल्या या धाडसी दरोड्यामुळे थेरला शिवार आणि परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून नागरिकांनी पोलीस प्रशासनाने तातडीने कारवाई करावी, अशी मागणी केली आहे.या हल्ल्यामुळे गावकऱ्यांमध्ये तीव्र संताप असून परिसरातील सुरक्षेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

## गैबीसाहेब दर्गा चे ब्रूज पूर्णतः पडण्याच्या मार्गावर प्रशासनाचे दुर्लक्ष

प्रतिनिधी @ गेवराई

रंगार चौक येथे सर्व धर्माचे लोकांचे श्रद्धेचे स्थान म्हणजे प्रसिद्ध गैबीसाहेब दर्गा हे आहे परंतु काही वर्षपासून ह्या दर्ग्याच्या ब्रूजचा अर्धा भाग हे पडला असून माजी राज्यकर्ते यांना वारंवार मागणी करण्यात आली मागणीची पूर्तता पण झाली होती परंतु माजी राज्यकर्ते च्या अपुऱ्या पाठपुराठ्या मुळे सदर काम रखडले गेले आहे.सदर दर्गा ही निजाम कालीन वास्तू आहे याचे काम करण्यासाठी वक्फ बोर्ड चे नाहरकत ची आवश्यकता असते आज चे वक्फ अध्यक्ष त्या काळातील सदस्य समीर काजी साहेबांनी या दर्ग्या ला भेट देऊन लवकरात लवकर हे काम करून घ्यावे त्या साठी मी नाहरकत देण्यास तयार आहे असे सांगितले होते आणि त्यांनी नाहरकत दिले पण परंतु माजी राज्यकर्ते च्या अपुऱ्या पाठपुराठ्या सदर काम झाले नाही.



दैनिक सांजसुयोग व मराठवाडा न्युज चे शेख जावेद सर यांनी माजी राज्यकर्ते यांना वारंवार या कामा बद्दल पाठपुरवठा केला होता आणि आता पण माजी आमदार अमरसिंह पंडित साहेब व लोकप्रिय आमदार विजयसिंह पंडित यांच्या जवळ सदर दर्ग्याच्या कामा संबंधी पाठपुरवठा करत आहे सदर कामाचे खर्चाचा अंदाज पत्रक पण विध्यमान आमदार साहेबांना दिले आहे परंतु ते आत्ताच सत्ते वर आल्या कारणांमुळे सदर कामाला विलंब लागत आहे गेवराई नगर परिषद प्रशास्नानाला प्रसिध्दीपत्रक द्वयारे सांगायचे की सध्या पावसाळ्याचे दिवस आहे सतत पाऊस चालू आहे त्या मुळे राहिलेलं ब्रूज पण पढण्याचे मार्गावर आहे पंढण्यापूर्वी प्रशासनाने मध्यस्थी करून हे ब्रूज स्वतः जबाबदारी ने काढून घेण्यात यावे जेणे करून पुढे होणारे अनर्थ किंवा जीवितहानी होणार नाही.

## रस्त्यांचे बोगस काम करणाऱ्या राजकमल कन्स्ट्रक्शनला कायमस्वरुपी काळी यादीत टाकावे - वर्षा जगदाळे

### वर्षा पासून निवेदन आंदोलन करूनही प्रशासनाला जाग येईना पालकमंत्री अजित दादा तुम्हीच आता लक्ष घाला

प्रतिनिधी @ बीड

बीड जिल्ह्यातील महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास विभागाअंतर्गत कोट्यावधी रुपयांचे टेंडर बीड येथील मे राजकमल कन्स्ट्रक्शन कंपनी यांनी घेतले आहे. जिल्हाभरातील राजकमल कन्स्ट्रक्शन कंपनीने केलेल्या कामाची तक्रारी जिल्हाधिकारी यांच्यापासून ग्रामीण रस्ते विकास विभागाच्या अधिकाऱ्यांना देण्यात आलेली आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने गेल्या वर्षी रस्ते विकास विभागाच्या कार्यालयासमोर मोठे आंदोलन उभे करण्यात आले.अनेक तक्रारी करण्यात आल्या छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय कार्यालयात तसेच पुणे येथील कॉलिटी कंट्रोल विभागालाही तक्रार करण्यात आली मात्र भ्रष्ट अधिकारी व राजकीय वरदहस्त प्राप्त असल्यामुळे राजकमल कन्स्ट्रक्शन कंपनी रस्त्यांची बोगस कामे करूनही यांच्यावर कोणतीच कारवाई करण्यात आलेली नाही. बीडचे पालकमंत्री शिस्तीचे व चांगले काम करून घेणारे अजित दादा पवार असल्याने या राजकमल कन्स्ट्रक्शन कंपनीची चौकशी करत तत्काळ या कंपनीला काळी यादीत टाकत अधिकाऱ्यावर कारवाई करण्याची मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या राज्य महिला उपाध्यक्ष वर्षाताई



जगदाळे यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

मे. राजकमल कन्स्ट्रक्शन कंपनी यांच्याद्वारे बीड जिल्ह्यातील ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात रस्त्यांचे काम सुरू आहे यासाठी मुख्यमंत्री ग्राम सडक योजना व पंतप्रधान ग्राम सडक योजनेच्या माध्यमातून ग्रामीण रस्ते विकास विभागाअंतर्गत कोट्यावधी रुपयांचे टेंडर राजकमल कन्स्ट्रक्शन कंपनीला देण्यात आलेले आहे. गेवराई तालुक्यातील सात कामांची व बीड तालुक्यातील दोन कामांची तक्रार राजकमल कन्स्ट्रक्शनच्या विरोधात करण्यात आलेली आहे. यासाठी राष्ट्रीय विकास विभागाच्या कार्यालयासमोर जागरण गोंधळ आंदोलन करण्यात आले. यासह जिल्हाधिकारी यांच्यापासून छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय कार्यालय व पुणे येथील कॉलिटी कंट्रोल कार्यालयाला आहे तक्रार करण्यात आली मात्र राजकमल कन्स्ट्रक्शन कंपनी विरोधात अद्यापही कोणतेच ठोस कार्यवाही करण्यात आलेली नाही. पालकमंत्री अजित दादा ह बीड जिल्हा दौऱ्यावर येत आहेत, जिल्ह्यातील भ्रष्ट अधिकाऱ्यांची कान टोचण्याचे धमक फक्त अजित दादा यांच्यातच आहे. राजमल कन्स्ट्रक्शन कंपनीच्या भ्रष्टाचाराचा पाडा मोठा आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने केलेले तक्रारींची व आंदोलनाची दखल घेत या भ्रष्ट कन्स्ट्रक्शन कंपनीच्या सर्व कामांची चौकशी करत या कंपनीला कायमस्वरूपी काळी यादीत टाकण्याची मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या महिला आघाडीच्या राज्य उपाध्यक्ष वर्षा जगदाळे यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

## कपिलधार येथे भुस्खलनाचा धोका, ग्रामस्थांना धोका होणार नाही यासाठी उपाययोजना कराव्यात-आ.संदीप क्षीरसागर

### जिल्हाधिकाऱ्यांना पत्रकातून केली मागणी

बीड (प्रतिनिधी):- बीड तालुक्यातील कपिलधार येथे भुस्खलनाचा धोका निर्माण झाला असून ग्रामस्थांच्या सुरक्षिततेसाठी उपाययोजना करण्याची मागणी आ. संदीप क्षीररसागर यांनी केली आहे.

बीड विधानसभा क्षेत्रातील मौजे कपिलधार ग्रामपंचायत पाली अंतर्गत येत आहे. सदरील गाव हे डोंगराच्या कुशीत वसलेले आहे. तसेच त्याच्या बाजूला कपिलधार हे तीर्थक्षेत्र हे ठिकाण आहे. याठिकाणी हजारो भाविक भक्त दर्शनासाठी येत



असतात.मात्र या ठिकाणी भुस्खलनाचा धोका निर्माण झाला असून संरक्षण भिंत पूल देखील कोसळली आहे. याबाबत आ.संदीप क्षीरसागर यांनी वारंवार शासनाकडे पत्र व्यवहार करून उपाययोजना करण्याची मागणी केली होती. १३ सप्टेंबर पासून सुरू असलेल्या अतिवृष्टीमुळे संरक्षण भिंत देखील कोसळली आहे. तसेच रहदारी साठी योग्य असलेला रस्ता देखील खचत चालला आहे. त्यामुळे जीवित हानी टाळण्यासाठी व कपिलधारवाडी ग्रामस्थांना कोणताही धोका होणार नाही

### बीड, शिरूर (का),वासनवाडी येथे तातडीने उपाययोजना करण्याच्या सूचना केल्या


वासनवाडी ता.बीड येथील गाव तलाव फुटला असून परिसरातील ग्रामस्थांनी खबरदारी घ्यावी. तसेच बीड व शिरूर (का) तालुक्यातील नदी पात्रावरील रहदारी योग्य असणारा पुल वाहुन गेलेले आहेत. त्या बाबतीत तातडीने उपया योजना बाबत प्रशासनास सूचना केल्या आहेत.

## सोनीमोहा येथील नदीवरील पूल गेला वाहून; वाहतूक ठप्प

किल्ले धारूर (मोमीन इर्शाद)

धारूर तालुक्यातील सोनीमोहा गावातील सोनी नदीवरील पूल वाहून गेल्यामुळे गावचा संपर्क तुटला असून वाहतूक ठप्प झाली आहे.

गेल्या दोन-तीन दिवसापासून धारूर तालुक्यात पावसाचा कहर सुरू आहे अनेक नद्यांना पूर आले आहेत तर या पाण्यामुळे नदीवरील पूल वाहून गेले आहेत सोनीमोहा नदीवरील पूल देखील वाहून गेला आहे यामुळे चोंडी, जाहीरमोहा कडे



जाणारी वाहतूक ठप्प झाली आहे विद्यार्थ्यांना शाळेत येण्या जाण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे

# स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका पुन्हा लांबणीवर:कोर्टाची जानेवारी ३१पर्यंत मुदतवाढ

प्रतिनिधी @ मुंबई

महाराष्ट्रातील रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत सर्वोच्च न्यायालयात आज महत्त्वाची सुनावणी झाली. सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारला ३१ जानेवारी २०२६ पूर्वी सर्व जिल्हा परिषद, पंचायत समित्या, नगरपालिका आणि महानगरपालिकांच्या निवडणुका पूर्ण करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच निवडणूक आयोगाला नोव्हेंबर २०२५ पर्यंत ईव्हीएम मशीन उपलब्ध करून द्याव्यात, अशाही सूचना देण्यात आल्या. गेल्या काही वर्षांपासून राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडल्या आहेत. मात्र, सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे आता या निवडणुकांना गती मिळणार आहे. न्यायालयाने दिलेल्या मुदतीनुसार, सरकार आणि राज्य निवडणूक आयोगाला ठराविक वेळेत निवडणूक प्रक्रिया पार पाडाबीच लागणार आहे. मे महिन्यात झालेल्या सुनावणी वेळी सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोग आणि महाराष्ट्र सरकारला चार महिन्यांत सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांची संपूर्ण निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्याचे

आदेश दिले होते. त्याशिवाय जर ते शक्य नसेल, तर वेळ वाढवून घेण्यासाठी आमच्याकडे यावे लागेल, असे सुप्रीम कोर्टाने म्हटले होते. त्यानंतर निवडणुकीच्या दृष्टीने तयारी सुरू झाली. अनेक महापालिकांमधील प्रभाग रचना जारी करण्यात आली. जिल्हा



परिषद, पंचायत समितीसाठी आरक्षण सोडत काढण्यात आली. त्यानंतर आज राज्य आयोगाने सुप्रीम कोर्टात आज अर्ज दाखल करत आम्हाला जानेवारी २०२६ पर्यंत मुदत वाढवून द्यावी, असा अर्ज राज्य निवडणूक आयोगाने सर्वोच्च न्यायालयात केला होता. या अर्जावर आज सुनावणी पार पडली. सुनावणीदरम्यान न्यायालयाने आयोगाला सप्टेंबरपासून जानेवारीपर्यंत एवढा मोठा अवधी का हवा? अशी विचारणा केली. यावर ईव्हीएम मशीनची उपलब्धता नसणे, आगामी काळातील सण उत्सव, विद्यार्थ्यांच्या परीक्षा आणि कर्मचाऱ्यांची कमतरता, अशी कारणे आयोगाच्या वतीने देण्यात आली. निवडणूक आयोगाने मांडलेल्या कारणांचा विचार करून सर्वोच्च न्यायालयाने मुदतवाढ देत असल्याचे

सांगितले. त्यामुळे आता जानेवारी २०२६ अखेरपर्यंत राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेणे बंधनकारक ठरणार आहे. दरम्यान, ओबीसी आरक्षणामुळे यावर्षी निवडणुका होऊ शकल्या नाहीत. आम्हाला अपेक्षित होत की चार महिन्यांत निवडणुका व्हाव्यात. आम्हाला वाटत होते की, या महिन्याच्या शेवटी निवडणुका होतील. आज प्रकरण सुनावणीसाठी

आल्यावर राज्य निवडणूक आयोग अर्ज करतेय की, आणखी निवडणुका पुढे ढकला. निवडणुका आणखी सूचीबद्ध झाल्या नाहीत. त्या व्हायला पाहिजे होत्या, अशी स्पष्ट नाराजी सर्वोच्च न्यायालयाने व्यक्त केली. दरम्यान, ३१ जानेवारी २०२६ पर्यंत सर्व प्रकारच्या निवडणुका पार पडल्या पाहिजेत. तसेच राज्य निवडणूक आयोगाने त्यांच्या ज्या मागण्या असतील त्यासंदर्भात

सवर्वोच्च न्यायालयाने मुदतवाढ देताना स्पष्ट केले आहे. ईव्हीएमची मागणी, कर्मचाऱ्यांची मागणी यासंदर्भात राज्याच्या मुख्य सचिवांना पत्र पाठवा. सर्व मागण्या कशा पूर्ण करता येतील, कामाचे टप्पे कसे असतील यासंदर्भात न्यायालयाने आयोगाला वेळापत्रक दिले असल्याचे कोर्ट म्हणाले. मागील सुनावणीवेळी चार महिन्यांत निवडणुका घेऊ म्हणणाऱ्या निवडणूक आयोगाचा हलगर्जीपणा झाल्याचे दिसत आहे, अशी टिप्पणी देखील सर्वोच्च न्यायालयाने केली. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार ३१ जानेवारी २०२६ पर्यंत राज्य निवडणूक आयोगाला सर्व महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद, नगर परिषद, नगर पंचायत आणि पंचायत समितांच्या निवडणुका घेऊन निकालही जाहीर करावा लागेल. एकंदरित जानेवारी अखेर सगळी निवडणूक प्रक्रिया पार पाडण्याचे आव्हान राज्य निवडणूक आयोगासमोर असणार आहे.



## तुलसी महाविद्यालयात मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन उत्साहात साजरा

प्रतिनिधी @ बीड

देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय, बीड येथे बुधवार (दि.१७) रोजी मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.कार्यक्रमाची सुरूवात महापुरुषांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर, विशेष पाहुणे डॉ. सुनील जोंधळे यांच्या हस्ते सकाळी ७.४५ वाजता महाविद्यालयाच्या प्रांगणात ध्वजारोहण संपन्न झाले.ध्वजवंदनानंतर उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना देशप्रेम, सामाजिक जबाबदारी आणि मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच स्वातंत्र्यसेनानींच्या त्यागाचे स्मरण ठेवून राष्ट्रसेवेची प्रेरणा घेण्याचे आवाहनही त्यांनी केले.यावेळी प्रा.डी.जी.निकाळजे (प्राचार्य, तुलसी महाविद्यालय), डॉ. विजयकुमार बांदल (प्राचार्य, गुरुकुल महाविद्यालय), डॉ.अश्विनी बेद्रे (प्राचार्य, फॅशन कॉलेज), प्रा.डी.डी. राऊत (प्राचार्य, नर्सिंग कॉलेज) आणि प्रा.प्रकाश ढोकणे (प्राचार्य, कनिष्ठ महाविद्यालय) यांच्या प्रमुख उपस्थितीत प्राध्यापकवर्ग, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जनतेचा पैसा जनतेसाठी की सरकारी बाबूंना सुविधा पुरवण्यासाठी?

## छत्रपती शिवाजी महाराज चौक ते राजुरी वेस दरम्यान रस्त्याची नोंद कुठल्याही शासकीय कार्यालयात नसताना रस्त्याचे काम कोण करतोय? - अमरजान पठाण

प्रतिनिधी @ बीड

छत्रपती शिवाजी महाराज चौक ते राजुरी वेस दरम्यान रस्त्याची नोंद कुठल्याही शासकीय कार्यालयाच्या दप्तरी नसताना रस्त्याचे काम कोण करतोय? रस्ता आणि रस्त्याचा निधी मंजूर नसतानाही छत्रपती शिवाजी महाराज चौक ते जिल्हा परिषद गेटपर्यंत रस्त्याचे काम होत असेल, तर जनतेच्या पैशाचा वापर जनतेसाठी होतोय की सरकारी बाबूंना सुविधा पुरविण्यासाठी होतोय,असा प्रश्न महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे बीड शहराध्यक्ष अमरजान पठाण यांनी प्रशासनासमोर मांडला आहे.

सविस्तर वृत्त असे की, बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते बशीरगंज,राजुरी वेस,कारंजा रोड,बलभीम चौक,जुना बाजार ते कोतवाल वेस पर्यंत रस्त्याचे काम तात्काळ सुरू करण्यात यावे या मागणीसाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने बीड नगरपरिषद कार्यालय व जिल्हाधिकारी कार्यालय यांना रीतसर निवेदन देऊन मागणी करत अनेक वेळा रस्त्याच्या मागणीसाठी निदर्शने,आंदोलनेही करण्यात आली.तरी बीड नगरपरिषदेच्या कार्यालयाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज चौक ते बशीरगंज राजुरी वेस दरम्यान रस्ता आमच्या कार्यालय अंतर्गत येत नाही,असा लेखी पत्र देण्यात आला.

या पत्राचे अवलोकन करत जिल्हा परिषद कार्यालय, सार्वजनिक बांधकाम कार्यालय व राष्ट्रीय महामार्ग कार्यालय यांना दिलेल्या निवेदनाचा पाठपुरावा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे बीड शहराध्यक्ष अमरजान पठाण यांनी केला असता,जिल्हा परिषद कार्यालय,सार्वजनिक बांधकाम व राष्ट्रीय महामार्ग कार्यालय इत्यादींच्या वतीने लेखी पत्र देण्यात आले आहे की,छत्रपती शिवाजी महाराज चौक ते बशीरगंज राजुरी वेस दरम्यान रस्ता हा त्यांच्या कार्यालयांतर्गत येत नाही अथवा या कार्यालयांच्या दप्तरात रस्त्याची नोंद नाही.



जर कुठल्याही शासकीय कार्यालयाच्या दप्तरी रस्त्याची नोंद नसेल,तर छत्रपती शिवाजी महाराज चौक ते जिल्हा परिषद कार्यालयाच्या गेटपर्यंत होत असलेल्या रस्त्याचे काम कोण करतोय? आजपर्यंत जो रस्ता झाला त्याचा निधी कोणी उचलला? रस्ता मंजूर नसतानाही कंत्राटदार कुणाच्या सांगण्यावरून किंवा कोणत्या अधिकाऱ्यांच्या दबावावरून रस्त्याचे काम करत आहे? रस्ता करण्यासाठी जो खर्च होतो तो खर्च भ्रष्टाचार करून जनतेच्या खिशातूनच भरणार आहे का? छत्रपती शिवाजी महाराज चौक ते जिल्हा परिषद कार्यालयाच्या गेटपर्यंत होत असलेले रस्त्याचे काम हे सरकारी बाबूंना सुविधा पोहोचवण्यासाठीच, म्हणजेच त्यांची गाडी गेटपर्यंत पोहोचण्यासाठी होत आहे का? असा प्रश्न महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे बीड शहराध्यक्ष अमरजान पठाण यांनी जिल्हा प्रशासनासमोर मांडला आहे. या प्रश्नांचे उत्तर जिल्हाधिकारी आणि पालकमंत्र्यांनी जनतेला द्यावे.जर छत्रपती शिवाजी महाराज चौक ते बशीरगंज राजुरी वेस,कारंजा रोड, बलभीम चौक,जुना बाजार ते कोतवाल वेस पर्यंत रस्त्याचे काम लवकरच सुरू झाले नाही,तर मनसे स्टाइलने छत्रपती शिवाजी महाराज चौक ते बशीरगंज चौक दरम्यान रस्त्यावर भाजीमंडी भरून आंदोलन करण्यात येईल,असे प्रसिद्धी माध्यमांना दिलेल्या पत्रकात नमूद केले आहे.

जनतेच्या पैशाचा वापर सरकारी बाबूंना सुविधा पोहोचवण्यासाठी होत आहे.आम्ही जर जनतेच्या हितासाठी मागणी केली, तर सरकारी अधिकारी आम्हाला पत्र देतात की छत्रपती शिवाजी महाराज चौक ते बशीरगंज राजुरी वेस दरम्यान रस्ता हा आमच्या कार्यालयांतर्गत येत नाही.आणि तेच अधिकारी सरकारी बाबूंना सुविधा पोहोचवण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज चौक ते फक्त जिल्हा परिषद कार्यालय गेटपर्यंत रस्त्याचे काम करतात.

लवकरच जर छत्रपती शिवाजी महाराज चौक ते राजुरी वेस, कारंजा रोड,बलभीम चौक,जुना बाजार ते कोतवाल वेस पर्यंत रस्त्याचे काम सुरू झाले नाही,तर आम्ही मनसे स्टाइलने शिवाजी महाराज चौक ते बशीरगंज चौक दरम्यान रस्त्यावर भाजीमंडी भरवू,अशी प्रतिक्रिया महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे बीड शहराध्यक्ष अमरजान पठाण यांनी प्रसिद्धी माध्यमांशी बोलताना दिली.

# बीड रेल्वे स्थानकाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावासाठी जलसमाधी आंदोलन

## प्रशासनाच्या आश्वासनानंतर आंदोलन तुर्तास स्थगित :- बाळासाहेब मोरे पाटील

प्रतिनिधी @ बीड

बीड रेल्वे स्थानकाला भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात यावे, या प्रमुख मागणीसाठी शिवशक्ती भीमशक्ती विचार मंचच्या वतीने पाली येथील बिंदुसरा धरणात जलसमाधी आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाचे नेतृत्व मंचाचे प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब मोरे पाटील यांनी केले. प्रशासनाकडून ठोस लेखी आश्वासन मिळाल्यानंतर आंदोलन काही काळाने स्थगित करण्यात आले.

आज दि.१७ सप्टेंबर मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या पार्श्वभूमीवर बीड ते अहिल्यानगर रेल्वेगाडीला मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत हिरवा झेंडा दाखवून शुभारंभ करण्यात येणार आहे. मात्र, बीड रेल्वे स्थानकाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्याची मागणी दीर्घकाळापासून प्रलंबित आहे. ही मागणी लवकरात लवकर मान्य व्हावी, यासाठी पाली येथील बिंदुसरा धरणात जलसमाधी आंदोलन छेडण्यात आले. रेल्वे स्थानकाला लोकनेत्यांचे नाव दिल्यास सामाजिक ध्रुवीकरण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. लोक नेत्यांच्या नावाविषयी मतभेद आहेत परंतु महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाला अद्याप कोणीही विरोध केल्याचे दिसून येत नाही त्यामुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या




नावाला जिल्हा वासियांची पसंती असल्याचे सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी सांगितले.

१७ सप्टेंबर रोजी झालेल्या या आंदोलनावेळी पाली गावचे तलाठी अनिल गायकवाड, मंडळ अधिकारी शीतल चाटे, पोलीस उपनिरीक्षक नितीन काकरवाल, पो. कॉ. दुबाले, बाबर, जायभाय, तसेच आम आदमी पार्टी बीड जिल्हाध्यक्ष अशोक येडे, बीड शहराध्यक्ष सय्यद सादेक, रासप बीड तालुकाध्यक्ष बाबासाहेब सापणकर, रामहरी चाळक अंजनवतीकर आणि सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांची उपस्थिती होती.प्रशासनाने या मागणीसंदर्भात सकारात्मक भूमिका घेतल्याचे आश्वासन दिल्यानंतर आंदोलन काही वेळाने स्थगित करण्यात आले. मात्र, जर मागणी पूर्ण न झाल्यास पुन्हा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा आंदोलनकर्त्यांनी दिला आहे.

## ७८ वर्षांतही अधूरा असलेला परळी-बीड-अहमदनगर रेल्वेमार्ग आता श्रेयासाठी नेते रांगेत





प्रतिनिधी @ बीड

परळी-बीड-अहमदनगर हा रेल्वे प्रकल्प १० वर्षांत पूर्ण व्हावा अशी अपेक्षा होती, मात्र तब्बल ७८ वर्षं उलटल्यानंतरही तो अद्याप पूर्ण झालेला नाही. या प्रकल्पाचे श्रेय लाटण्यासाठी आता बीडमधील नेते मंडळी एका पाठोपाठ एक रांगेत उभे राहत आहेत.१९४७ पासून या रेल्वे मार्गाची चर्चा सुरू आहे. दशकानुदशके हा विषय फक्त आश्वासनापुरताच सीमित राहिला. अधुरी कामे, निधीची कमतरता आणि राजकीय अनास्थेमुळे हा प्रकल्प आजतागायत पूर्ण होऊ शकलेला नाही.

मात्र आता निवडणुका जवळ येताच, रेल्वे रुळावर अजून एक गाडी धावली नसतानाही श्रेय घेण्यासाठी एकच झुंबड उडालेली दिसते. कोणी भूमिपूजनाचे फोटो पोस्ट करतोय, तर कोणी वेटिंगमध्ये असलेला डबा दाखवत आमच्या प्रयत्नांना फळ मिळालं असे म्हणतोय.स्थानिक जनतेचे मात्र एकच म्हणणे: ७८ वर्षं वाट पाहिली, आता तरी गाडी धावू द्या, कोणीही श्रेय घ्या पण गाडी मात्र वेळेवर यायला हवी!

## बिंदुसरा नदीच्या पुरामुळे व अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या पडझड झालेल्या घरांचे दुकानांचे पशुधनाचे तात्काळ पंचनामे करून आर्थिक मदत द्या-शेख निजाम

प्रतिनिधी @ बीड

बीड जिल्ह्यात मागील पावसाळ्याच्या हंगामामध्ये अत्यंत संततधार पाऊस सुरू असल्यामुळे बीड जिल्ह्यातील अनेक लहान मोठे प्रकल्प तुडुंब भरलेले आहेत व नद्या नाले ओसंडून वाहत आहे एक-दोन दिवसापासून बीड जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी होऊन शेतकऱ्यांचे फार मोठे नुकसान झालेले आहे त्यांचे उभे पिक हातातून गेलेले आहे बीड शहराच्या मध्यवर्ती भागातून बिंदुसरा नदी वाहते मागील एक



दोन दिवसापासून पडणाऱ्या संततधार पावसामुळे बिंदूसरा नदीला पूर आलेला असून त्यामुळे व अतिवृष्टीमुळे विशेषता बीड शहराच्या मोमीनपुरा परिसर, खासबाग परिसर , बालेपिर बांगरणाला परिसर, लेंडी नाला परिसर, सेंटर नाला इत्यादी भागात मोठ्या प्रमाणात घरांमध्ये दुकानांमध्ये पाणी शिरलेले आहे त्यामुळे मोठ्या प्रमाणात नागरिकांचे व्यवसायिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे यामध्ये अनेक पशुधन मृत्युमुखी पडल्याचे दिसत आहे या भागातील अनेक घरांची पडझड झालेली असून शासनाने याचे त्वरित पंचनामे करून संबंधितांना मोबदला व आर्थिक मदत करण्यात यावी अशी विनंती महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय उपमुख्यमंत्री मा. ना. अजित दादा पवार साहेब यांच्याकडे केलेली असून शासनातर्फे भरीव मदत बिंदुसरा नदीच्या पुराच्या पाण्यामुळे व झालेल्या अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या नागरिकांना मिळणार आहे असे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शेख निजाम,शेख अमर, खय्युम इनामदार,मोमीन जुबेर, सय्यद आजम,शेख हमीद,शेख नसिर,शेख सत्तार इनामदार, शेख खदीर,शेख फारूक,शेख जाकीर यांनी निवेदनात म्हटले आहे

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसंदर्भात लवकरच भूमिका स्पष्ट करणार - विजय साळवे

### रिपब्लिकन सेनेचा पक्ष प्रवेश सोहळा माजलगाव येथे उत्साहात संपन्न

प्रतिनिधी @ माजलगांव

रिपब्लिकन सेना बीड जिल्हा अध्यक्ष विजय साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवार, दि. १६ सप्टेंबर २०२५ रोजी माजलगाव शहरातील व्यंकटेश हॉटेल येथे पक्षाची महत्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीस तालुका सल्लागार विलास गायसमुद्रे यांच्या अध्यक्षतेखाली मार्गदर्शन करण्यात आले.

बैठकीदरम्यान पात्रुड सर्कल मधील अनेक कार्यकर्त्यांनी रिपब्लिकन सेनेत जाहीर प्रवेश करून पक्ष बळकट करण्याचा निर्धार व्यक्त केला.



त्याचबरोबर पात्रुड सर्कल अध्यक्षपदी गणेश ढगे यांची निवड करण्यात आली. सय्यद मुजाहेद, सय्यद सज्जाद, सय्यद शकिल यांसह इतर कार्यकर्त्यांनी पक्ष प्रवेश करून समाजहितासाठी कार्य करण्याचा संकल्प केला.

बैठकीत पक्ष संघटन अधिक मजबूत करण्यावर, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आणि विविध कार्यक्रमांचे नियोजन याबाबत सविस्तर चर्चा झाली. जिल्हा अध्यक्ष विजय साळवे यांनी प्रत्येक घटकापर्यंत पोहोचून समाजातील एकजूट वाढविणे आणि सामाजिक बांधिलकी जोपासणे आवश्यक असल्याचे स्पष्ट केले. आगामी निवडणुकांसंदर्भात पक्ष लवकरच आपली भूमिका जाहीर करणार असल्याची माहिती त्यांनी दिली.या कार्यक्रमास वशिष्ठ लांडगे, वैजनाथ गडसिंग, सय्यद अन्वर भाई, संतोष पुणे, विश्वनाथ तोडके, सुरेश साळवे, निवृत्ती गायकवाड, अर्जुन परसे, लक्ष्मण काशीद, मुकुंद खरात, गणेश ढगे, विशाल ससाने, सय्यद नाजेर, सय्यद शकन, सय्यद अनवर जिलानी कुरेशी, शेख राजू यांसह स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित सर्वांनी एकजूट राखून समाजाच्या प्रगतीसाठी आणि पक्षवाढीसाठी काम करण्याचा संकल्प केला.

हे पत्रक मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक शेख बिलाल शेख युसुफ यांनी आर.एम. प्रिंटर्स, बार्शी रोड बीड - ४३११२२ येथे छापून सायं.दैनिक विश्वनायक कार्यालय, खासबाग खाजानगर देवी रोड, बीड ता.बीड जिल्हा बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशितकेले आहे.संपादक शेख बिलाल शेख युसुफ मो.८६८६८८८८९८ Email : vishvanayak94@gmail.com